# तज्ञ गटाद्वारे सामाजिक आघात निर्धारण अहवालाचे मुल्यमापन

**दि. २३/०९/२०२१ रोजी सकाळी ११:३० वाजता झालेला भुसंपादन गट नं १८१/१/२ मौजे तळेगांव ता इगतपुरी नगरपरिषद / ग्रामपंचायत क्षेत्रात सार्वजनिक प्रयोजनसाठी इगतपुरी गावाच्या पाणी पुरवठा योजने करीता सामाजिक परीणाम निर्धारण अभ्यास समितीचा अहवालाचे मुल्य मापन करणेबाबत बैठकीचे इतिवृत्त**

दि.२३/०९/२०२१ रोजी सकाळी ११:३० वाजता मा. समन्वय अधिकारी (भूसंपादन) नाशिक श्रीमती वासंती माळी यांचे अध्यक्षतेखाली भुमी संपादन पुर्नवसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम ७ अन्वये तज्ञ गटाचे बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस उपस्थित अधिकारी / कर्मचारी यांची स्वतंत्र रजिस्टर उपस्थितीबाबत स्वाक्षरी घेण्यात आली आहे.

सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सकाळी ११:३० वाजता बैठकीस सुरवात करण्यात आली. हर्षल ग्रामीण विकास बहु. संस्था चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर यांनी दि. ०७/०८/२०२१ रोजीचा अहवाल सर्वांना वाचवुन दाखविला आहे. सदर प्रसंगी मुल्यांकन तज्ञ सदस्य डॉ. व्ही. जे. देशमुख समाजशास्त्रज्ञ यांनी " भूसंपादन करणेची शिफारस आहेच, पण जमिनमालकाला न्याय मिळणे आवश्यक " असे मत व्यक्त केले. तसेच डॉ. एस. डी. सावळे (समाजशास्त्रज्ञ) यांनी " भूसंपादनाला संमती आहे पण जमिन मालकाशी वाटाघाटी व्हाव्यात ", असे मत व्यक्त केले. नविन भूसंपादन कायदा २०१३ चे अंतर्गत, श्री. देशमुख (समाजशास्त्रज्ञ ) व श्री. सावळे (समाजशास्त्रज्ञ ) यांना, योग्य ती कार्यवाही केली जाईल असे निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच चर्चेअंती मुल्यांकन समितीने पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविले.

१) मौजे तळेगांव गावातील भूधारकांचे ग. नं. १८१/१/२ मध्ये ०.१६ हे.आर इतके क्षेत्र संपादीत करण्याचे नियोजित आहे.
२) निर्धारीत केलेल्या जमिनीचे संपादनासाठी कायदेशीर व सद्भावी सार्वजनिक प्रयोजन आहे.
३) सदर सार्वजनिक प्रयोजनासाठीचा सामाजिक खर्च व प्रतिकूल सामाजिक आघात यापेक्षा प्रस्तावित सार्वजनिक प्रयोजन अधिभावी आहे. किंबहुना प्रतिकूल सामाजिक आघात उद्भवणार नाही.
४) प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या जमिनीचे केवळ किमान क्षेत्र संपादीत करण्याचे नियोजित आहे.
५) क्षेत्रामध्ये पूर्वी संपादीत केलेली परंतु न वापरलेली जमिन तेथे नाही.

सामाजिक परीणाम निर्धारण अहवालाचे अवलोकन करून ही समिती मौजे तळेगांव, ता. इगतपुरी, नगरपरीषद / ग्रामपंचायत क्षेत्रातील सार्वजनिक प्रयोजनासाठी इगतपुरी गावाच्या पाणी पुरवठा योजनेकरीता आवश्यक असणारे ग. नं. १८१/१/२ मधील क्षेत्र ०.१६ हे.आर इतके क्षेत्र सार्वजनिक क्षेत्राकरीता आवश्यक असल्याने संपादन करण्याची शिफारस करीत आहोत.

श्री. अनिल रामटेके
हर्षल ग्रामीण विकास बहु. संस्था,
चंद्रपुर

श्री. दिपक कुंडलीक चव्हाण
(पुर्नवसन तज्ञ) सदस्य

श्री.डॉ.एस.डी.सावळे
(समाजशास्त्रज्ञ )
सदस्य

श्री. डॉ. व्ही. जे. देशमुख
(समाजशास्त्रज्ञ)
सदस्य

श्रीमती गिता वाळु मेंगाळे
(नगरसेविका ) तळेगांव

श्री.रंगनाथ माधव चौधरी
(नगरसेवक) तळेगांव

श्री. डी. आर. अलगट
(उपअभियंता)
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
व जल व्यवस्थापन नाशिक

श्रीमती ज्योती कावरे
उपजिल्हाधिकारी, (भुसंपादन)
वैतरणा जलविदयुत प्रकल्प,
(सचिव)

श्रीमती वासंती माळी
समन्वय अधिकारी भूसंपादन
नाशिक (अध्यक्ष)